RNI NO - MHMAR/26/A2042

साप्ताहिक

# महाविद्यालय खबरबात

MAHAVIDYALAY KHABARBAT

संस्थापक
मुख्य संपादक - डॉ. राजकुमार मा.कोल्हे

डोंबिवली,कल्याण,ठाणे,रायगड,नागपुर येथुन प्रकाशित

संपादक - डॉ.सौ.प्रेरणा राजकुमार मा.कोल्हे

▪ वर्ष १ ▪अंक २ ▪ गुरुवार दिनांक ३० एप्रिल ते ०७ मे २०२६ ▪ किंमत ३ रुपये ▪ पाने ४

## डोंबिवलीतील ४सीबीएसई १0वी 'जन गण मन' शाळेचा ऐतिहासिक १00% निकाल

मुंबई (प्रतिनिधी) : जाह्नवीज मल्टी फाउंडेशनच्या डोंबिवली येथील जन गण मन इंग्लिश सेकंडरी स्कूल (सीबीएसई बोर्ड) ने इयत्ता दहावीच्या परीक्षेत यंदाही १०० टक्के निकालाची परंपरा कायम राखत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. शाळेच्या स्थापनेपासून सातत्याने शंभर टक्के निकालाची नोंद करत संस्थेने शैक्षणिक उत्कृष्टतेचा मानदंड उंचावला आहे.

यावर्षीच्या परीक्षेत विद्यार्थ्यांनी उत्कृष्ट कामगिरी करत शाळेचा लौकिक वाढवला आहे. इवा बनसरी अचिंत्य शो हिने ९६.४० टक्के गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. यथार्थ सरिता सुधाकर पवार (९५%) आणि सोनाक्षी गायत्री रामबहादुर प्रजापती (९२.४०%) यांनी अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवला. तसेच दिया भावनी दीपक कुंदर (९१.२०%) आणि सार्थक मानसी मंगेश भांबीड (९१%) यांनीही उल्लेखनीय यश संपादन केले.

विद्यार्थ्यांच्या या यशामागे त्यांची मेहनत, पालकांचा पाठिंबा आणि शिक्षकांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले आहे. शाळेच्या व्यवस्थापनाने सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करत शिक्षकवर्गाच्या समर्पित कार्याचे कौतुक केले.

संस्थापक अध्यक्ष डॉ. राजकुमार कोल्हे, सचिव डॉ. श्रीमती प्रेरणा कोल्हे आणि मुख्याध्यापिका श्रीमती ज्योती वेंकटरामन यांच्या नेतृत्वाखाली शाळा सातत्याने प्रगती करत आहे. गुणवत्तापूर्ण शिक्षण, शिस्त आणि सर्वांगीण विकास या तत्त्वांवर आधारित कार्यपद्धतीमुळे हे यश शक्य झाल्याचे व्यवस्थापनाने नमूद केले.

या यशामुळे संपूर्ण शाळा परिवारात आनंदाचे वातावरण असून, शैक्षणिक क्षेत्रातील आणखी एक यशस्वी अध्याय शाळेच्या नावावर नोंदवला गेला आहे.




## पुण्यातील लोकसेवा ई-स्कूलचा 10 वी सीबीएसई बोर्ड परीक्षेचा 100 टक्के निकाल, 14 विद्यार्थ्यांना 95 टक्क्यांपेक्षा अधिक गुण.....




लोकसेवा ई-स्कूलचा दहावीचा शैक्षणिक वर्ष 2025-26 च्या सीबीएसई बोर्ड परीक्षेत 100 टक्के निकाल लागला आहे. निकालाची ही उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे. प्रथम आलेल्या नीरजा बिहानी ला 99.4 टक्के, द्वितीय आलेल्या श्रेया मानकर ला 99.2 टक्के तर, नीलाद्री भट्टाचार्य ला 98.6 टक्के गुण मिळाले आहेत.

तब्बल 14 विद्यार्थ्यांनी 95 टक्क्यांपेक्षा अधिक गुण तर 48 विद्यार्थ्यांनी 90 टक्क्यांहून अधिक

शाळेच्या 151 विद्यार्थ्यांनी यावर्षी दहावीची परीक्षा दिली होती. यापैकी सर्व विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून तब्बल 14 विद्यार्थ्यांनी 95 टक्क्यांपेक्षा अधिक गुण मिळवले आहेत. तसेच, 48 विद्यार्थ्यांनी 90 टक्क्यांहून अधिक तर, 89 विद्यार्थ्यांना 80 टक्क्यांहून अधिक गुण मिळाले आहेत. महाराष्ट्रातील शाळांमध्ये उत्कृष्ट कामगिरीची परंपरा लोकसेवा ई स्कूलने कायम राखली आहे. त्यासाठी संस्थेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि सर्वांचेच योगदान महत्त्वपूर्ण राहिले आहे. या यशाबद्दल संस्थेचे संस्थापक अध्यक्ष दीपक पायगुडे, शिक्षण विभागाचे संचालक नरहरी पाटील, प्राचार्य शॉफीमोन पीएच यांनी सर्व यशस्वी विद्यार्थी, शिक्षक आणि कर्मचाऱ्यांचे कौतुक केले आहे.

विद्यार्थ्यांना उच्च दर्जाच्या शिक्षणातून उज्ज्वल भविष्य घडवण्यासाठी संस्था कटिबद्ध

लोकसेवा ई-स्कूल भविष्यातही अशाच पद्धतीने उज्ज्वल यशाची परंपरा कायम राखण्यासाठी प्रयत्नशील राहणार आहे. विद्यार्थ्यांना उच्च दर्जाच्या शिक्षणातून उज्ज्वल भविष्य घडवण्यासाठी संस्था कटिबद्ध असणार आहे असे प्राचार्य पी शाफी मोन यांनी सांगितले.

शैक्षणिक वर्ष 2025-26 चा निकाल 93.70 टक्के

केंद्रीय माध्यमिक शिक्षण बोर्ड म्हणजेच सीबीएसईनं दहावीच्या परीक्षेचा निकाल जाहीर केला आहे. शैक्षणिक वर्ष 2025-26 चा निकाल 93.70 टक्के लागला आहे. गेल्या वर्षी सीबीएसईच्या दहावीचा निकाल 93.66 टक्के होता, त्या तुलनेत यंदा निकालात सुधारणा झाली आहे. बोडार्नं यावेळी उत्तरपत्रिकांची तपासणी विक्रमी वेळेत पूर्ण करत निकाल दरवर्षीच्या तुलनेत एक महिना अगोदर जाहीर केला आहे.

मुलींनी मारली बाजी  दरवर्षीप्रमाणं यंदा देखील सीबीएसईच्या दहावीच्या निकालात मुलींनी मुलांना मागं टाकत बाजी मारली आहे.

## सीबीएसई बोर्डाच्या शाळांमध्ये आता सहावीपासून तीन भाषांची सक्ती




मुंबई - सीबीएसई बोडार्चा नवीन शिक्षणक्रम जाहीर करण्यात आला असून नवीन शिक्षण क्रमानुसार सीबीएसई बोर्डाने इयत्ता सहावी पासून तीन भाषा विषय आणि इयत्ता नववी पासून गणित आणि विज्ञानाचे द्विस्तरीय रचनेचा अवलंब केला आहे. सीबीएसई शाळांमध्ये इयत्ता सहावी वगार्पासून पुढील वर्षी शिकवल्या जाणाऱ्या तीन पैकी दोन भारतीय भाषा असतील. सोबतच तिसरी भाषा 42 भाषांपैकी एक भाषा ही विद्यार्थ्यांनी तिसरी भाषा निवडायची आहे. सीबीएसई बोर्डाच्या शाळांमध्ये तीन भाषा विद्यार्थ्यांना शिकाव्या लागतील. दरम्यान, येणाऱ्या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता सहावीपासून सीबीएसई बोर्डाच्या शाळांमध्ये तीन भाषा विद्यार्थ्यांना शिकाव्या लागतील तर परदेशातून भारतीय शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना तीन भाषांच्या अटीतून सूट असेल त्यासोबतच मंडळाने पुढील वर्षीपासून गणित आणि विज्ञानासाठी नेहमीच्या ऐंशी गुणांच्या परीक्षा व्यतिरिक्त आणखी एक पर्याय दिला आहे. ही परीक्षा 25 गुणांची असून त्यात संबंधित विषयाची आकलन क्षमता कसोशीने तपासली जाणार आहे. यातील गुण एकूण गुन्ह्यांमध्ये समाविष्ट न करता त्याची गुणपत्रिकेवर वेगळी नोंद करण्यात येईल, अशी देखील माहिती आहे.

विद्यार्थ्यांसाठी काय बदलणार आहे?

आतापर्यंत, बहुतेक शाळांमध्ये केवळ दोन भाषा अनिवार्य विषय म्हणून होत्या. नवीन धोरणानुसार, विद्यार्थ्यांना एक अतिरिक्त भाषा शिकणे आवश्यक असेल. यामुळे त्यांच्या अभ्यासाची व्याप्ती वाढेल, तसेच विद्यार्थ्यांना नवीन भाषा शिकण्याची आणि समजून घेण्याची संधीही मिळेल. सीबीएसईचा विश्वास आहे की, यामुळे मुलांच्या विचारशक्तीचा विकास होईल आणि विविध भाषा व संस्कृतींबद्दलची त्यांची समज वाढेल.

तिसऱ्या भाषेला अधिक वेळ का दिला जात आहे?

नवीन पद्धतीनुसार, इयत्ता ६ वी ते ८ वी हा मधला टप्पा मानला जातो. या काळात तिसऱ्या भाषेचा अभ्यास सुरू होईल आणि विद्यार्थ्यांना ती शिकण्यासाठी पुरेसा वेळ दिला जाईल. सीबीएसईच्या मते, अनेक विद्यार्थ्यांसाठी तिसरी भाषा पूर्णपणे नवीन असू शकते. त्यामुळे, ती समजून घेण्यासाठी, बोलण्यासाठी आणि लिहिण्यासाठी सराव आणि वेळ आवश्यक आहे.

भाषा संस्कृती आणि अस्मितेला जोडेल

अभ्यासक्रमाच्या आराखड्यानुसार, भाषा केवळ अभ्यासाचा विषय नाही, तर संस्कृती आणि समाजाशी जोडले जाण्याचे एक साधन देखील आहे. भारतात अनेक समृद्ध भाषा आहेत आणि प्रत्येक भाषेची स्वतःची एक वेगळी ओळख आहे. जेव्हा विद्यार्थी एकापेक्षा जास्त भारतीय भाषा शिकतील, तेव्हा त्यांना देशाची विविधता अधिक चांगल्या प्रकारे समजेल. यामुळे त्यांच्यातील एकतेची भावना देखील दृढ होईल.सीबीएसई बोर्डाच्या शाळांमध्ये आता सहावीपासून तीन भाषांची सक्ती करण्यात आली आहे. सीबीएसई बोडार्चा नवीन शिक्षणक्रम जाहीर करण्यात आला असून नवीन शिक्षण क्रमानुसार सीबीएसई बोर्डाने इयत्ता सहावी पासून तीन भाषा विषय आणि इयत्ता नववी पासून गणित आणि विज्ञानाचे द्विस्तरीय रचनेचा अवलंब केला आहे. सीबीएसई शाळांमध्ये इयत्ता सहावी वगार्पासून पुढील वर्षी शिकवल्या जाणाऱ्या तीन पैकी दोन भारतीय भाषा असतील. सोबतच तिसरी भाषा 42 भाषांपैकी एक भाषा ही विद्यार्थ्यांनी तिसरी भाषा निवडायची आहे.

सीबीएसई बोर्डाच्या शाळांमध्ये तीन भाषा विद्यार्थ्यांना शिकाव्या लागतील

दरम्यान, येणाऱ्या शैक्षणिक वर्षापासून इयत्ता सहावीपासून सीबीएसई बोर्डाच्या शाळांमध्ये तीन भाषा विद्यार्थ्यांना शिकाव्या लागतील तर परदेशातून भारतीय शाळांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांना तीन भाषांच्या अटीतून सूट असेल त्यासोबतच मंडळाने पुढील वर्षीपासून गणित आणि विज्ञानासाठी नेहमीच्या ऐंशी गुणांच्या परीक्षा व्यतिरिक्त आणखी एक पर्याय दिला आहे. ही परीक्षा 25 गुणांची असून त्यात संबंधित विषयाची आकलन क्षमता कसोशीने तपासली जाणार आहे. यातील गुण एकूण गुन्ह्यांमध्ये समाविष्ट न करता त्याची गुणपत्रिकेवर वेगळी नोंद करण्यात येईल, अशी देखील माहिती आहे.

विद्यार्थ्यांसाठी काय बदलणार आहे?

आतापर्यंत, बहुतेक शाळांमध्ये केवळ दोन भाषा अनिवार्य विषय म्हणून होत्या. नवीन धोरणानुसार, विद्यार्थ्यांना एक अतिरिक्त भाषा शिकणे आवश्यक असेल. यामुळे त्यांच्या अभ्यासाची व्याप्ती वाढेल, तसेच विद्यार्थ्यांना नवीन भाषा शिकण्याची आणि समजून घेण्याची संधीही मिळेल. सीबीएसईचा विश्वास आहे की, यामुळे मुलांच्या विचारशक्तीचा विकास होईल आणि विविध भाषा व संस्कृतींबद्दलची त्यांची समज वाढेल.

# संपादकीय

## अमेरिका-इराण तणाव

**युद्धाची सावली आणि त्याचे परिणाम....**

मध्यपूर्वेतील अस्थिरता पुन्हा एकदा जागतिक चिंतेचा विषय ठरत आहे. United States आणि Iran यांच्यातील दीर्घकालीन तणाव अलीकडच्या घडामोडींमुळे अधिक तीव्र झाल्याचे दिसून येत आहे. थेट मोठ्या प्रमाणावर युद्ध जाहीर झालेले नसले, तरी लष्करी हालचाली, निर्बंध, आणि अप्रत्यक्ष संघर्ष यामुळे परिस्थिती गंभीर बनली आहे.या तणावामागे अणुकार्यक्रम, आर्थिक निर्बंध, प्रादेशिक प्रभाव आणि राजकीय मतभेद ही प्रमुख कारणे आहेत. विशेषतः इराणच्या अणुकार्यक्रमाबाबत अमेरिकेची भूमिका कठोर राहिली आहे. यामुळे दोन्ही देशांमध्ये अविश्वास वाढत गेला आणि संघर्षाची परिस्थिती निर्माण झाली.

**मानव जीवनावर परिणाम....**

या तणावाचा सर्वात मोठा फटका सामान्य नागरिकांना बसतो. युद्धाची भीती, असुरक्षितता, आणि स्थलांतर यामुळे लाखो लोकांचे जीवन अस्थिर होते. आरोग्य, शिक्षण आणि रोजगार यांसारख्या मूलभूत गरजांवर परिणाम होतो.

**आर्थिक परिणाम....**

अमेरिका-इराण तणावाचा परिणाम जागतिक अर्थव्यवस्थेवरही होतो. विशेषतः तेलाच्या किमतीत मोठी चढ-उतार दिसून येते, कारण मध्यपूर्व हा तेलसाठ्यांचा प्रमुख भाग आहे. भारतासारख्या देशांवर याचा थेट परिणाम होतो—इंधन दरवाढ, महागाई आणि आयात खर्च वाढतो.

डॉ.राजकुमार कोल्हे
मुख्य संपादक

**जागतिक स्थैर्यावर परिणाम....**

या संघर्षामुळे संपूर्ण मध्यपूर्वेतील शांतता धोक्यात येते. इतर देशही या संघर्षात अप्रत्यक्षपणे गुंतले जाऊ शकतात, ज्यामुळे व्यापक युद्धाची शक्यता निर्माण होते. जागतिक राजकारणात ध्रुवीकरण वाढण्याची भीती आहे.

**मानसिक आणि सामाजिक परिणाम....**

सततच्या तणावामुळे लोकांमध्ये भीती आणि असुरक्षिततेची भावना वाढते. युद्धजन्य परिस्थितीमुळे समाजात अस्थिरता आणि असंतोष निर्माण होतो.

**शांततेची गरज....**

अशा परिस्थितीत संवाद, कूटनीती आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य अत्यंत महत्त्वाचे ठरते. वल्र्डीं ठं३ङ्ल्ल२ आणि इतर जागतिक संस्था या संघषार्ला थांबवण्यासाठी प्रयत्नशील आहेत.

**निष्कर्ष....**

अमेरिका-इराण तणाव हा केवळ दोन देशांपुरता मर्यादित नाही; त्याचे परिणाम संपूर्ण जगावर होतात. युद्ध हे कधीही समस्येचे समाधान नसते. त्यामुळे शांततेचा मार्ग स्वीकारणे, संवाद वाढवणे आणि मानवतेला प्राधान्य देणे हीच आजची खरी गरज आहे. 'युद्धाची किंमत नेहमी सामान्य माणूसच चुकवतो.'

# युद्धाचे परिणाम आणि आजच्या जगातील संघर्षांचे वास्तव

आजच्या आधुनिक जिथेतिथे संगणक आणि मोबाईल सारखे अनेक प्रगत उपकरणे आहेत. त्याचप्रमाणे बॉम्ब आणि बंदूक अनेक प्रकारचे आधुनिक उपकरणे ही आहेत त्यामुळे आताचे युद्ध ही पूर्वीच्या युद्धाच्या तुलनेत अतिशय भयानक आहे. या प्रगत जगातही युद्धाचे सावट पूर्णपणे दूर झालेले नाही, ही एक मोठी शोकांतिका आहे. विज्ञान, तंत्रज्ञान आणि जागतिक सहकार्याच्या युगातही काही देशांमध्ये संघर्ष सुरूच आहेत. या युद्धांचे परिणाम केवळ त्या देशांपुरते मर्यादित राहत नाहीत, तर संपूर्ण जगावर व मानवजातीवर त्याचा प्रभाव पडतो. युद्धाचा सर्वात भयंकर परिणाम म्हणजे मानवी जीवितहानी. लढाईत सैनिकांसोबतच निरपराध नागरिकांचे प्राण जातात. अनेक कुटुंबे उद्ध्वस्त होतात, मुलं अनाथ होतात आणि समाजाची रचना कोलमडते. युद्धामुळे निर्माण होणारी भीती, असुरक्षितता आणि मानसिक ताण ही जखम दीर्घकाळ टिकणारी असते. आर्थिक दृष्टिकोनातून पाहता, युद्ध देशाची कणा मोडून टाकते. उद्योग-व्यवसाय ठप्प होतात, पायाभूत सुविधा नष्ट होतात आणि महागाई वाढते. याचा थेट परिणाम सामान्य जनतेच्या जीवनमानावर होतो. शिक्षण आणि आरोग्य यांसारख्या मूलभूत सेवा विस्कळीत होतात, ज्यामुळे पुढील पिढीचे भविष्य धोक्यात येते. अनेक निर्दोष जनावरे विनाकारण यात बळी घेतले जातात. जमीन नापीक होते. आजच्या घडीला रशियाझ युक्रेन संघर्ष, इस्त्रायलझहमास संघर्ष, सूदानमधील अंतर्गत संघर्ष आणि यमनमधील दीर्घकालीन युद्ध नवीनच आहे ते म्हणजे ईरान अमेरिका आणि अनेक देश ८ संघर्षांत विनाकारण ओढले जात आहेत. या प्रत्येक ठिकाणी सामान्य लोकांचे जीवन अत्यंत कठीण झाले आहे. अन्न, पाणी आणि औषधांची टंचाई, सुरक्षिततेचा अभाव आणि सततची भीती हेच त्यांच्या दैनंदिन आयुष्याचे वास्तव बनले आहे. लाखो लोकांना आपले घर सोडून स्थलांतर करावे लागत आहे. निसर्गाच्या दृष्टीने ह्याचा परिणाम खूप दीर्घकाळ टिकून राहील. धर्तीवर त्याच्या नकारात्मक प्रभाव वर्षानुवर्षे सगळ्याच दृष्टीकोनातून दिसत राहील. या सर्व परिस्थितीत एक महत्त्वाचा प्रश्न उभा राहतो—युद्धातून खरेच काय मिळते? किंवा युद्ध हा पर्याय आहे का? काही वेळा राजकीय किंवा भौगोलिक उद्दिष्टे साध्य होतात, परंतु मानवी दृष्टिकोनातून पाहता नुकसानच अधिक होते. माणुसकी, समायोजन, सहअस्तित्व आणि शांततेच्या मूल्यांना तडा जातो.

डॉ. प्रेरणा राजकुमार कोल्हे
संपादक

# पालकांना आर्थिक दिलासा, शालेय बसचे भाडे आता सरकार ठरवणार; राज्यातील्या स्कूल बस चालकांची मनमानी मोडीत निघणार......



मुंबई - महाराष्ट्रात स्कुल बसच्या भाडे नियंत्रणासंदर्भात मोठी बातमी समोर आलं आहे. यात नवीन नियमांनुसार शालेय बसचे भाडे आता प्रादेशिक परिवहन प्राधिकरणाकडून निश्चित केले जाणार आहे. परिणामी, विद्यार्थ्यांकडून फक्त मासिक भाडेच आकारले जाईल. तर आगाऊ रक्कम घेण्यास मनाई करण्यात आली आहे. त्यामुळे पालकांना आर्थिक दिलासा मिळणार आहे. शालेय वाहतूक अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि उत्तरदायी करण्यासाठी राज्य सरकार कटिबद्ध असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे.

सुरक्षितता, पारदर्शकता आणि जबाबदारी यावर विशेष भर

शालेय विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत महाराष्ट्र शासनाने शालेय बस व वाहतूक व्यवस्थेबाबत कडक आणि सर्वसमावेशक नियमावली जाहीर करण्याची तयारी सुरू केली आहे. गृह विभागाने प्रसिद्ध केलेल्या मसुदा अधिसूचनेनुसार, 'महाराष्ट्र मोटार वाहन नियम, 2026' लागू करण्याचा प्रस्ताव असून, यात सुरक्षितता, पारदर्शकता आणि जबाबदारी यावर विशेष भर देण्यात आला आहे. या बाबतीत अधिसूचना जाहीर झालेल्या दिनांकापासून पंधरा दिवस या विहित वेळेत संबंधित संकेतस्थळावर सर्व सामान्य जनतेकडून हरकती व सूचना मागविण्यात आल्या असून त्याला सकारात्मक प्रतिसाद द्यावा, असे आवाहन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी केले आहे.

पालकांच्या तक्रारींवर त्वरित तोडगा...

दरम्यान, प्रत्येक शाळेत स्कूल ट्रान्सपोर्ट कमिटी कार्यरत राहणार असून, ती भाडे, सुरक्षितता आणि सेवा यासंबंधी पालकांच्या तक्रारींचे निवारण करेल. तसेच तिमाही अहवाल सादर करणे बंधनकारक करण्यात आले आहे.

सुरक्षेसाठी अत्याधुनिक तंत्रज्ञान अनिवार्य....

सर्व शालेय बस व व्हॅनमध्ये GPS-आधारित Vehicle Location Tracking Device (VLTD) व पॅनिक बटण बसवणे बंधनकारक करण्यात आले आहे. याशिवाय अग्निसुरक्षा यंत्रणा , CCTV प्रणाली, तसेच सर्व सीट्ससाठी सीट बेल्टची सक्ती केली आहे.

डिजिटल मॉनिटरिंग प्रणाली लागू....

विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी प्रत्येक वाहनात डिजिटल सेफ्टी मॉनिटरिंग सिस्टम बसवणे आवश्यक असेल. या प्रणालीद्वारे वाहनाचे लाईव्ह ट्रॅकिंग, डिजिटल उपस्थिती नोंद, स्वयंचलित अलर्ट आणि पालकांना थेट माहिती मिळणार आहे. राज्यस्तरीय प्लॅटफॉर्मशी या प्रणालीचे एकत्रीकरणही करण्यात येणार आहे.

विद्यार्थ्यांच्या देखरेखीवर विशेष भर....

प्रत्येक विद्यार्थ्याची चढ-उतार वेळेसह दैनिक उपस्थिती नोंदवणे बंधनकारक असेल. विशेषतः पूर्व-प्राथमिक आणि प्राथमिक विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक प्रवासात महिला परिचारिका किंवा नियुक्त कर्मचारी असणे आवश्यक राहील.

अपंग व विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी सुविधा...

विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांसाठी प्रशिक्षित कर्मचारी, सुलभ प्रवेश व्यवस्था आणि आवश्यक तेव्हा पालक/शिक्षक उपस्थितीची तरतूद करण्यात आली आहे.

कर्मचाऱ्यांची काटेकोर पडताळणी...

बस चालक, वाहक व इतर कर्मचाऱ्यांची पार्श्वभूमी तपासणी, वैद्यकीय फिटनेस प्रमाणपत्र आणि अधिकृत नियुक्तीपत्र अनिवार्य करण्यात आले आहे. सर्व नोंदी तपासणीसाठी उपलब्ध ठेवणे बंधनकारक असेल.

नियमांचे उल्लंघन केल्यास कठोर कारवाई....

नवीन नियम लागू झाल्यानंतर तीन महिन्यांत सर्व शालेय वाहने नियमांनुसार सुसज्ज करणे आवश्यक राहील. अन्यथा संबंधित वाहनांचे परवाने निलंबित किंवा रद्द करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

संयुक्त तपासणी यंत्रणा....

शालेय वाहतुकीची नियमित तपासणी शिक्षण व परिवहन विभाग संयुक्तपणे करणार असून, त्याचे अहवाल जिल्हा पातळीवरील समितीकडे सादर केले जातील. या सुधारित नियमांमुळे शालेय वाहतूक अधिक सुरक्षित, शिस्तबद्ध आणि तंत्रज्ञानाधारित होणार असून, पालक आणि विद्यार्थ्यांचा विश्वास अधिक दृढ होणार असल्याची भावना परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केली आहे

# मराठवाड्यातील विद्यार्थ्यांसाठी लातूरमध्ये साकारतेय १७२ कोटींचे हायटेक 'सारथी' संकुल....

लातूर( प्रतिनिधी ) - राज्याचे शैक्षणिक केंद्र असलेल्या लातूरच्या लौकिकात मोठी भर पडत असून, १७२ कोटींचे प्रशस्त व अत्याधुनिक सुविधा असलेले ह्यसारथी'चे विभागीय संकुल आकाराला येत आहे. बारा मजली दोन स्वतंत्र वसतिगृहांसह ग्रंथालय आणि अभ्यासिकांचे काम अंतिम टप्प्यात असून, दोन महिन्यांत ही वास्तू विद्यार्थ्यांच्या सेवेत रुजू होणार आहे. मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगरबरोबरच लातूरमध्ये हे संकुल सुरू होत असल्याने मराठवाड्यातील लक्षित गटातील विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक, सामाजिक आणि आर्थिक उन्नतीला मोठी चालना मिळणार आहे.



मराठा, कुणबी, कुणबी-मराठा व मराठा-कुणबी समाजातील विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी छत्रपती शाहू महाराज संशोधन, प्रशिक्षण व मानव विकास संस्था (सारथी) कार्यरत असून, राज्यभर विभागीय कार्यालये व अत्याधुनिक वसतिगृहे उभारण्यात येत आहेत. लातूरमध्ये बार्शी रोडवरील वरवंटी येथील महिला आयटीआयच्या १.६० हेक्टर जागेवर सुसज्ज विभागीय कार्यालयाचे बांधकाम सुरू असून, याचे काम २०२४-२५ मध्ये सुरू झाले आहे. राज्य शासनाने या प्रकल्पासाठी १७२.८६ कोटींच्या निधीला प्रशासकीय मान्यता दिली असून, आतापर्यंत १०१ कोटींहून अधिक निधी खर्च झाला आहे.

१२ मजली दोन स्वतंत्र वसतिगृहेमुले आणि मुलींसाठी स्वतंत्र १२ मजल्यांची दोन वसतिगृहे उभारण्यात आली आहेत. एका वसतिगृहात ५०० याप्रमाणे एकूण एक हजार विद्यार्थ्यांच्या निवासाची सोय येथे होणार आहे. प्रत्येक रूममध्ये स्वतंत्र ४ बेड, कपाट, अभ्यासाचे टेबल आणि प्रसाधनगृहाची सुविधा देण्यात आली आहे.

वसतिगृहात पंचतारांकित सुविधा१२ मजली वसतिगृहात ठराविक मजल्यानंतर विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी अत्याधुनिक जीम, मेडिटेशन रूम, वैद्यकीय कक्ष, टीव्ही रूम आणि इनडोअर गेमिंग रूम, किचन, लॉन्ड्री आणि ॲक्टिव्हिटी सभागृहांचे नियोजन करण्यात आले आहे.

स्पर्धा परीक्षार्थीसाठी 'स्मार्ट' लायब्ररीएकाचवेळी ३६४ विद्यार्थी बसून अभ्यास करू शकतील, अशी सुसज्ज हायटेक अभ्यासिका आणि ग्रंथालय येथे उभारले जात आहे. विद्यार्थ्यांसाठी हे केंद्र मोठे ऊर्जास्थान ठरणार आहे.

चार जिल्ह्यांचे प्रशासकीय मुख्यालयलातूर येथील हे विभागीय कार्यालय लातूर, धाराशिव, परभणी आणि बीड अशा चार जिल्ह्यांसाठी मुख्य केंद्र म्हणून काम करेल. या इमारतीमध्ये अधिकारी-कर्मचारी कक्ष, व्हीसी मिटिंग रूम आणि कॉन्फरन्स हॉलचे काम सध्या सुरू आहे. एमपीएससी, यूपीएससी पूर्व प्रशिक्षण, उच्च शिक्षण शिष्यवृत्ती आणि कौशल्य विकासाच्या योजनांची प्रभावी अंमलबजावणी या कार्यालयाकडून होईल, अशी आशा आहे.

# जय हिंद कॉलेजमध्ये 'डेटूर'चा धमाका! राणी मुखर्जीची एन्ट्री अन् विद्यार्थ्यांचा कल्ला; पहिल्याच दिवशी मोठी गर्दी



मुंबई( प्रतिनिधी ) - मुंबईतील प्रसिद्ध 'जय हिंद कॉलेज'चा मास मीडिया विभागाचा वार्षिक महोत्सव 'डेटूर' यंदा आपल्या १७व्या वर्षात पदार्पण करत असून, पहिल्याच दिवशी या महोत्सवाने मुंबईतील तरुणाईला वेड लावले आहे. यंदाची 'द विंगमॅन शो' ही अनोखी थीम घेऊन आलेल्या या महोत्सवाच्या पहिल्याच दिवशी बॉलीवूडची 'क्वीन' राणी मुखर्जीने हजेरी लावत सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

कथानकातील 'साइडकिक्स'चा सन्मान....

नेहमी मुख्य पात्रांभोवती फिरणारी प्रसिद्धीची वलये बाजूला सारून, पडद्यावरचे लाडके 'साइड हिरो' आणि 'विंगमन' यांना यंदा डेटूरने प्रसिद्धीच्या झोतात आणले आहे. २० जानेवारी रोजी या महोत्सवाची दणक्यात सुरुवात झाली. मुंबईतील २० हून अधिक नामवंत महाविद्यालयांच्या संघांनी आपल्या अफाट उर्जेने कॉलेजचा परिसर दणाणून सोडला.

राणी मुखर्जीच्या करिअरचे ३० वे वर्ष साजरे.

पहिल्या दिवसाचे मुख्य आकर्षण ठरली ती म्हणजे बॉलिवूड अभिनेत्री राणी मुखर्जी! आपल्या चित्रपट सृष्टीतील प्रवासाला ३० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने तिने 'डेटूर'च्या मंचावरून विद्यार्थ्यांशी संवाद साधला. 'रो-टॉक्स' सोबतच्या या विशेष सत्रात राणीने आपल्या आठवणींना उजाळा दिला, गाणी गायली आणि विद्यार्थ्यांना यशाचे कानमंत्रही दिले. राणीला प्रत्यक्ष पाहिल्यानंतर विद्यार्थ्यांनी टाळ्या आणि शिट्ट्यांच्या कडकडाटात तिचे स्वागत केले.

महोत्सवाच्या इतिहासात पहिल्यांदाच मीडिया क्षेत्राबाहेरील विद्यार्थ्यांसाठी 'जॅम' ही स्पर्धा खुली करण्यात आली होती. या स्पर्धेचे परीक्षण खुद्द 'गॉड ऑफ जॅम' म्हणून ओळखले जाणारे होर्मुझ रगीना यांनी केले. विनोद, बुद्धिमत्ता आणि हजरजबाबीपणाचा हा खेळ पाहून प्रेक्षकही पोट धरून हसले. पहिल्याच दिवशी 'डेटूर'ने आपल्या नावाप्रमाणेच एक वेगळी आणि यशस्वी वाट चोखाळली आहे. येत्या काही दिवसांत हा उत्साह आणखी वाढणार असल्याचे आयोजकांनी म्हटले.

# वरिष्ठ महाविद्यालयांचे प्राचार्य, संचालक, प्राध्यापकांना प्रशिक्षण अनिवार्य - उच्च व तंत्र शिक्षण मंत्री....



मुंबई ( प्रतिनिधी ) - राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीच्या दिशेने राज्यात महत्त्वपूर्ण पाऊल उचलण्यात आले आहे. चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमातील ह्यऑनर्स' व ह्यऑनर्स विथ रिसर्च'च्या चौथ्या वर्षाच्या अंमलबजावणीसंदर्भात उच्च व तंत्र शिक्षण विभाग आणि उच्च शिक्षण संचालनालय यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यातील सर्व वरिष्ठ महाविद्यालयांचे प्राचार्य, संचालक, प्राध्यापकांसाठी तीन दिवसीय विशेष ऑनलाईन प्रशिक्षण सत्र आयोजित करण्यात आले आहे. त्यामध्ये सर्व संबंधितांचा सहभाग अनिवार्य राहणार असल्याचे निर्देश उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी दिले. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० च्या अंमलबजावणीत महाराष्ट्र देशात आघाडीवर असून, शैक्षणिक वर्ष २०२६-२७ पासून राज्यात चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमातील चौथे वर्ष लागू होत आहे. या नव्या टप्प्याची प्रभावी आणि एकसमान अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. उच्च शिक्षण व्यवस्थेत लवचिकता, संशोधनाभिमुखता आणि विद्यार्थी-केंद्रितता वाढविण्यासाठी ही पुनर्रचना अत्यंत महत्त्वाची असल्याचे मंत्री चंद्रकांत पाटील यांनी नमूद केले.

# कासार समाज फाऊंडेशनवर कल्याणी रांगोळे यांची नियुक्ती....



नांदगांवःनांदगाव ज्या समाजात आपण जन्म घेतला आहे त्याचा अभिमान बाळगून समाजाचे ऋण फेडण्यासाठी कटीबद्ध राहिले पाहिजे असे प्रतिपादन जागतिक कासार समाज फाऊंडेशनचे राष्ट्रीय युवा अध्यक्ष सौरभ कोळपकर यांनी केले. ते येथील सोमवंशी क्षत्रिय कासार समाज कालिका मंदिरात झालेल्या पदग्रहण समारंभ प्रसंगी बोलत होते.व्यासपीठावर अशोक दगडे, संतोष भुजबळ, संदीप चिमटे, देवेंद्र शेटे उपस्थित होते. कार्यक्र माच्या अध्यक्षस्थानी भास्कर कासार हे होते. ते पुढे म्हणाले की समाज अल्प असल्याने शासनाचे पाहिजे तसे लक्ष नाही आपण ओबीसीत असलो तरी सवलती घेण्यास बर्याच अडचणी येतात त्यामुळे शासनाने कासार समाजाला एन.टी. बी मध्ये समाविष्ट करून घ्यावे यासाठी सर्व समाज बांधवांनी एकत्र येणे गरजेचे आहे. यावेळी संतोष भुजबळ यांनी आपल्या मनोगतात सांगितले की कासार समाज हा विखुरलेला आहे.जागतिक कासार समाज फाउंडेशन च्या माध्यमातून सर्व समाज एकत्र आणण्याचे काम सुरू आहे.समाजातील प्रत्येक व्यक्तीमध्ये समाज प्रेम निर्माण करून त्यांना प्रोत्साहन दिले पाहिजे. संदीप चिमटे, अशोक दगडे यांनी जागतिक कासार समाज फाउंडेशन बाबत माहिती देताना फाउंडेशनची स्थापना कशासाठी झाली ? फाउंडेशनचे उद्देश काय ? हे स्पष्ट केले.युवती अध्यक्ष म्हणून पदभार स्वीकारलेल्या कु.कल्याणी रांगोळे हिने आपल्या मनोगतातून सांगितले की,जी कधी ही जात नाही ती जात असते. समाजात व्यक्तिने आपला स्तर कुठल्याही क्षेत्रात उंचावला की त्याच्या जातीचा स्तर देखील उचावत असतो.

# अकरावी प्रवेशात यंदापासून मुलींसाठी स्वतंत्र फेरी; शासनाने महत्त्वपूर्ण निर्णय केला जारी




मुंबई - यंदापासून राज्यातील सर्व अकरावी प्रवेश ऑनलाइन व गुणवत्तेनुसार होणार असून, मुलींसाठी स्वतंत्र विशेष फेरीची तरतूद करण्यात आली आहे. १५ जुलैपासून ११वीचे वर्ग सुरू होणार आहेत. या पार्श्वभूमीवर शासनाने हा महत्त्वपूर्ण निर्णय सोमवारी जारी केला आहे. नवीन प्रक्रियेनुसार, ३ नियमित फेऱ्या घेण्यात येणार आहेत. त्यानंतर सर्वांसाठी खुली फेरी होईल आणि त्यापुढे केवळ मुलींसाठी विशेष पाचवी फेरी आयोजित केली जाईल. गुणवत्ता निश्चित करताना राज्य मंडळाच्या विद्यार्थ्यांच्या सर्वोच्च पाच विषयांचे गुण विचारात घेतले जाणार आहेत. प्रत्येक विद्यार्थ्यास एकाच अर्जाद्वारे राज्यातील कोणत्याही शाळेची निवड करता येईल.नवीन नियमानुसार... शाळा व महाविद्यालयांची माहिती संकेतस्थळावर भरणे : १० एप्रिल ते २५ एप्रिल, माहितीचे प्रमाणीकरणः २६ एप्रिल ते ५ मे, विद्यार्थ्यांचे ऑनलाइन प्रोफाइल तयार , करणे : ५ मे ते १४ मे .

# NSUI तर्फे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा विभागासमोर आंदोलन.....



पुणे ( प्रतिनिधी ) - अभियांत्रिकीच्या प्रथम वर्ष व चतुर्थ वर्षाच्या विद्यार्थ्यांसाठी तात्काळ फोटो कॉपीसाठी लिंक उपलब्ध करून देण्यात यावी.- N+2+1 नियमाच्या बाहेर राहिलेल्या सर्व विद्यार्थ्यांना बॅकलॉग परीक्षा देण्याची सरसकट संधी देण्यात यावी. ए.टी.के.टी. संदर्भातील प्रलंबित प्रश्न तातडीने मार्गी लावावेत. ज्या विद्यार्थ्यांना हॉल तिकीट मिळाले असूनही त्यांच्या परीक्षेचे वेळापत्रक मिळालेले नाही, त्याबाबत स्पष्ट माहिती तात्काळ जाहीर करण्यात यावी, या प्रमुख मागण्यांसाठी नॅशनल स्टुडंट्स युनियन ऑफ इंडिया तर्फे सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात आंदोलन करण्यात आले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या परीक्षा विभागातील विविध विद्यार्थ्यांच्या समस्यांबाबत ठरवकतर्फे प्रभारी संचालक डॉ. प्रभाकर देसाई यांना निवेदन देण्यात आले. विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक भविष्याशी संबंधित गंभीर प्रश्न तात्काळ सोडवावेत, अशी मागणी ठरवक ने केली आहे. ठरवकमहाराष्ट्र प्रदेश मीडिया विभागाचे चेअरमन महेश अनिल कांबळे यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, विद्यापीठातील अनेक विद्यार्थ्यांना परीक्षा प्रक्रियेतील त्रुटी व तांत्रिक अडचणींमुळे मोठा त्रास सहन करावा लागत आहे. यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून परीक्षा विभागाने तातडीने योग्य निर्णय घेऊन विद्यार्थ्यांना दिलासा द्यावा.

या आंदोलनामुळे विद्यार्थ्यांच्या प्रश्नांकडे प्रशासनाचे लक्ष वेधले गेले असून NSUI च्या आंदोलनाला यश मिळाल्याचे पदाधिकाऱ्यांनी सांगितले. या वेळी मीडिया चेअरमन महेश कांबळे, प्रदेश उपाध्यक्ष अक्षय कांबळे, प्रदेश सचिव प्रसन्न मोरे, तेजस बनसोडे यांच्यासह ठरवकचे अनेक कार्यकर्ते आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

# ठाण्यात शिक्षणाचा खेळखंडोबा? गुजराती शिक्षकांकडून मराठी माध्यमांना धडे....

ठाणे( प्रतिनिधी ) - ठाणे : ठाणे महापालिकेच्या शाळांची गुणवत्ता सुधारण्यासाठी आणि पटसंख्या वाढविण्यासाठी प्रशासन प्रयत्न करत असतानाच, शिक्षण व्यवस्थेतील गंभीर त्रुटी समोर आल्या आहेत. गुजराती माध्यमातील शिक्षकांकडून मराठी माध्यमाच्या विद्यार्थ्यांना शिकवले जात असल्याची बाब नगरसेवक अनिल भोर यांनी सभागृहाच्या निदर्शनास आणून दिली. तसेच आवश्यक शैक्षणिक पात्रता नसलेले शिक्षक विद्यार्थ्यांना शिकवत असल्याचा दावा करत त्यांनी शिक्षणाच्या गुणवत्तेबाबत प्रश्न उपस्थित केला.

# तर महाराष्ट्राचे चित्र पलटू शकते; डॉ. दीपक पवार यांचं प्रतिपादन, विवेकवसा फाउंडेशन तर्फे वाचक पुरस्काराचं वितरण....




पुणे ( प्रतिनिधी ) - महाराष्ट्राची प्रगल्भ विचार परंपरा विसरून आपण बाहेरून आयात केलेल्या आक्रमक सांस्कृतिक राजकारणाच्या आहारी गेलो आहोत. मात्र महाराष्ट्र हेच राष्ट्र आहे, या भावनेने आपल्या सगळ्या परंपरेचा विचार केला पाहिजे. सातवाहन काळापासून ते संयुक्त महाराष्ट्र चळवळीच्या काळापर्यंत विचार व्हावा. मात्र केवळ पूर्वगौरवात रमण्यासाठी नाही तर संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचे दुसरे पान २०२६ नंतर उलटवणे शक्य आहे का ? हे पाहिले पाहिजे. असं प्रतिपादन मराठी अभ्यास केंद्राचे अध्यक्ष आणि ख्यातनाम वक्ते डॉ. दीपक पवार यांनी केले.

पुढे म्हणाले, पहिले पान उलटवले ते सगळे वाचणारे, विचार करणारे आणि चिकित्सक होते. यामध्ये एस एम जोशी, डांगे, अत्रे यांच्यापासून ते प्रबोधनकार ठाकरेंपर्यंतच्या लोकांचा समावेश होतो. या लोकांचा वारसा आपण चालवला तर महाराष्ट्राचे चित्र पलटू शकते असंही ते म्हणाले.

जागतिक पुस्तक दिनानिमित्त विवेकवसा फाउंडेशनने आयोजित केलेल्या 'वाचन, मराठी आणि महाराष्ट्र' या विषयावरील व्याख्यानात पवार बोलत होते. या वेळी फाउंडेशनतर्फे सुगावाकार प्रा. विलास वाघ यांच्या स्मृती प्रित्यर्थ देण्यात येणारा ह्यवाचक पुरस्कार' गंगाधर सत्त्वधर यांना पवार यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. यावेळी फाउंडेशनचे संघटक विशाल विमल, दत्तात्रय संकपाळ उपस्थित होते.

# मुंबई विद्यापीठ राजकारण करत असल्याचा आरोप; हे विद्यापीठ टीकेच्या केंद्रस्थानी का आलंय?

मुंबई ( प्रतिनिधी ) - भारतातल्या जुन्या आणि पहिल्या तीन विद्यापीठांपैकी एक असलेलं जवळपास 169 वर्षांचा शैक्षणिक वारसा असलेलं मुंबई विद्यापीठ सध्या टीकेच्या केंद्रस्थानी आहे.



मुंबई विद्यापीठातील माजी संशोधक विद्यार्थी राजेश बळखंडे उर्फ भदंत विमांसा गेल्या दोनशेहून अधिक दिवसांपासून आपल्या विविध मागण्यांसाठी आंदोलन करत आहेत.

परंतु त्यांना भेटण्यासाठी आलेल्या तुषार गांधी यांना मुंबई विद्यापीठाने काही दिवसांपूर्वी विद्यापीठ संकुलात प्रवेश नाकारला. तुषार गांधी हे सामाजिक कार्यकर्ते आणि महात्मा गांधी यांचे पणतू आहेत.

यापूर्वी चित्रपट निर्माते-दिग्दर्शक आनंद पटवर्धन यांनाही विद्यापीठाने संकुलात प्रवेश करण्यापासून रोखलं होतं.

काही दिवसांपूर्वी हे आंदोलन सुरू झाल्यानंतर 'सुरक्षेचं कारण देत,' मुंबई विद्यापीठाने थेट विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांसाठी सुरू असलेल्या 'बेस्ट'ची बस सेवाही बंद केल्याची टीका ज्येष्ठ सिनेट सदस्य प्रदीप सावंत यांनी केली आहे.

साधारण महिन्याभरापूर्वी ज्येष्ठ अभिनेते नसीरुद्दीन शहा यांनी म्हटलं होतं की, मुंबई विद्यापीठात एका कार्यक्रमासाठी निमंत्रित केलं आणि नंतर ऐनवेळी येऊ नका असा निरोप देण्यात आला.

दरम्यान, मुंबई विद्यापीठाने यावर स्पष्टीकरण देत असं काही झालं नसल्याचं म्हटलं होतं. विद्यापीठाच्या उर्दू विभागानं नसीरुद्दीन शहा यांच्याशी कार्यक्रमातील त्यांच्या सहभागाबाबत किंवा कार्यक्रम रद्द करण्याबाबत काहीही संपर्क केला नसल्याचं विद्यापीठानं निवेदनाद्वारे म्हटलं होतं. परंतु या आणि अशा अनेक घडामोडींनंतर मुंबई विद्यापीठातलं वैचारिक स्वातंत्र्य आणि 'प्रवेशबंदी' याबाबत प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

# पिंपरी-चिंचवडच्या ध्रुव मर्दीकरची आंतरराष्ट्रीय स्पेलिंग बी स्पर्धेत तिसऱ्या क्रमांकाची कामगिरी.....

पिंपरी-चिंचवड ( प्रतिनिधी ) - पिंपरी-चिंचवडमधील दहा वर्षीय ध्रुव मर्दीकर याने आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश संपादन करत MaRRS Rediscover आयोजित स्पेलिंग बी स्पर्धेत तिसरा क्रमांक मिळवला आहे. ही स्पर्धा २६ एप्रिल रोजी मुंबईतील जीसीसी इंटरनॅशनल स्कूल येथे पार पडली.



बालवाडी येथील VIBGYOR हाय स्कूलचा विद्यार्थी असलेल्या ध्रुवने कठीण आणि बहुपर्यायी फेऱ्यांतून उत्कृष्ट कामगिरी करत हे यश मिळवले. या स्पर्धेत विद्यार्थ्यांची इंग्रजी भाषेवरील पकड विविध अंगांनी तपासण्यात आली. स्पेलिंग अचूकता, समानार्थी व विरुद्धार्थी शब्द, पार्ट्स ऑफ स्पीच, फोनिमिक स्क्रिप्ट ओळख तसेच श्रवण कौशल्ये या बाबींवर आधारित प्रश्नांमुळे स्पर्धेची पातळी उच्च होती.

देशभरातील विविध शाळांमधील विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता. त्यामुळे ही स्पर्धा अत्यंत चुरशीची ठरली. लहान वयात ध्रुवने मिळवलेले हे यश त्याच्या सातत्यपूर्ण मेहनतीचे आणि इंग्रजी भाषेवरील प्रभुत्वाचे द्योतक मानले जात आहे.

पुनावळे येथील पुणेव्हिले सोसायटीत राहणाऱ्या ध्रुवच्या यशाबद्दल त्याच्या कुटुंबीयांनी आणि शाळेने आनंद व्यक्त केला आहे. ध्रुवच्या पालकांनी सांगितले की, या यशामुळे त्याला पुढील वाटचालीसाठी प्रेरणा मिळेल. ध्रुवच्या या यशामुळे VIBGYOR हाय स्कूल, बालवाडी तसेच पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरातील विद्यार्थी समुदायात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले असून, इतर विद्यार्थ्यांनाही शैक्षणिक क्षेत्रात उत्कृष्टता साधण्याची प्रेरणा मिळत आहे.

'ध्रुवने मिळवलेले हे यश आमच्यासाठी अत्यंत अभिमानास्पद आहे. त्याने सातत्याने मेहनत घेतली आणि प्रत्येक टप्प्यावर लक्ष केंद्रित केले. या यशामुळे त्याला पुढे आणखी शिकण्याची आणि स्वतःला अधिक सक्षम बनवण्याची प्रेरणा मिळेल, असा आम्हाला विश्वास आहे. आम्ही त्याच्या प्रयत्नांना नेहमीच पाठिंबा देत राहू.'

# आता खासगी शाळांमध्येही फक्त NCERT पुस्तके, महागड्या पुस्तकावर बंदी; NHRC ने राज्यांना दिला 30 दिवसांचा वेळ....

मुंबई (प्रतिनिधी) - खासगी शाळांच्या मनमानी शुल्क वसुलीला पालक वैतागले आहेत. वेगवेगळ्या प्रकारे पैसे घेतले जात असून, यातच एक महत्त्वाची गोष्ट म्हणजे खासगी शाळांची महागडी पुस्तक विक्री. याचसंदर्भात आता राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने एक निर्णय सर्व राज्य सरकारांना दिला आहे. शाळा सरकारी असो वा खासगी मुलांसोबत कोणत्याही प्रकारे भेदभाव चालणार नाही. त्याचबरोबर सर्व खासगी शाळांमध्ये एनसीईआरटीचीच पुस्तके सक्तीची करण्यात यावी, असे निर्देश दिले आहेत.



प्रियंक कानूनगो यांच्या अध्यक्षतेखालील खंठपीठासमोर देशभरातून आलेल्या तक्रारींवर सुनावणी झाली. राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने सर्व राज्य सरकारे आणि केंद्रीय शिक्षण मंत्रालयाला नोटीस बजावली असून, ३० दिवसांत उत्तर सादर करण्यास सांगितले आहे. नमो फाऊंडेशनद्वारे आयोगासमोर हा मुद्दा मांडण्यात आला होता.

महागड्या पुस्तकांपासून पालकांची होणार सुटका....देशभरात सगळीकडे खासगी शाळांचे पीक आले आहे. या शाळांकडून वेगवेगळ्या प्रकारे वसुलीसारखेच शुल्क आकारले जात आहे. यातील चिंतेची बाब म्हणजे खासगी प्रकाशकांकडील पुस्तके खरेदी करण्यास सांगितले जाते. ही पुस्तके एनसीईआरटीच्या तुलनेत दहा-बारा पट जास्त महाग असतात. आता राष्ट्रीय मानवाधिकार आयोगाने म्हटले आहे की, इयत्ता आठवीपर्यंत एनसीइआरटी किंवा एससीईआरटी यांचीच पुस्तके अभ्यासक्रमात ठेवली जावी. खासगी शाळांमधील इयत्ता आठवीपर्यंतचा अभ्यासक्रम सरकारने ठरवलेल्या पद्धतीपेक्षा वेगळा का आहे?

# पिंपरीतील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ येथे भारतीय विद्यापीठ संघाची ऐतिहासिक सभा....



पुणे ( प्रतिनिधी ) - भारतीय उच्च शिक्षण क्षेत्रातील सर्वोच्च संस्था असलेल्या ह्यभारतीय विद्यापीठ संघाची' ऐतिहासिक १०० वी वार्षिक सर्वसाधारण सभा आणि कुलगुरूंची राष्ट्रीय परिषद यंदा पुण्यातील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ (अभिमत विद्यापीठ), पिंपरी, पुणे येथे आयोजित करण्यात आली आहे.

दि. २८ ते ३० एप्रिल २०२६ या कालावधीत होणाऱ्या या परिषदेत देशभरातील विद्यापीठांचे कुलगुरू आणि शिक्षणतज्ज्ञ उपस्थित राहणार आहेत. १९२५ मध्ये स्थापन झालेल्या अक्क चे हे शताब्दी वर्ष असल्याने या सभेला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. या महत्त्वपूर्ण परिषदेचे यजमानपद डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे भूषविणार आहे.या कार्यक्रमाचा उद्घाटन समारंभ मंगळवार, दि. २८ एप्रिल २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता, पिंपरी येथील डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ सभागृहात संपन्न होईल. महाराष्ट्राचे माननीय राज्यपाल मा. श्री. जिष्णू देव वर्मा यांच्या शुभहस्ते या कार्यक्रमाचे उद्घाटन होणार आहे.'या कार्यक्रमास मा. डॉ. पी. डी. पाटील, कुलपती, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे, भारतीय विद्यापीठ संघाचे अध्यक्ष - मा. प्रा. विनय कुमार पाठक, सरचिटणीस आणि सदस्य सचिव - डॉ. सौ. पंकज मित्तल तसेच मा. डॉ. सौ. भाग्यश्री पी. पाटील, प्र-कुलपती, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे आणि अध्यक्षा, ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटी, पुणे, मा. डॉ. सोमनाथ पी. पाटील, प्र-कुलपती, ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटी, पुणे आणि सचिव, डॉ. डी. वाय. पाटील युनीटेक सोसायटी, पुणे, मा. डॉ. सौ. स्मिता जाधव, प्र-कुलगुरू, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे आणि सचिव, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ सोसायटी, पुणे, मा. डॉ. यशराज पी. पाटील, विश्वस्त आणि खजिनदार, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ सोसायटी, पुणे तसेच मा. प्रा. डॉ. एन. जे. पवार, कुलगुरू, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे, हे सर्व मान्यवर उपस्थित राहणार आहेत.या शताब्दी महोत्सवी परिषदेचा मुख्य विषय 'ज्ञान आणि नाविन्यपूर्ण संशोधनाच्या माध्यमातून आत्मनिर्भर भारताला आकार देणे' असा आहे.या तीन दिवसीय परिषदेमध्ये देशभरातील ४०० हून कुलगुरू उपस्थित राहणार असून एकूण ३४ मान्यवर व्याख्याते विविध समकालीन विषयांवर सखोल विचारमंथन करणार आहेत. यामध्ये स्वदेशी आणि तंत्रज्ञान व आर्थिक राष्ट्रवाद, शाश्वतता व सामाजिक जबाबदारी, उद्योजकता व स्टार्टअप्स, कृत्रिम बुद्धिमत्ता व क्वांटम तंत्रज्ञान, विकसित भारत शिक्षा अधिष्ठान विधेयक, २०२५', उच्च शिक्षणात आंतरराष्ट्रीयीकरणाला चालना देणे तसेच भारतीय पारंपारिक ज्ञान या महत्त्वपूर्ण विषयांचा समावेश आहे.

भारतीय विद्यापीठ संघाचे शताब्दी वर्ष आमच्या विद्यापीठात साजरे केले जात आहे, याचा आम्हाला मनापासून आनंद होत आहे. शिक्षण क्षेत्रातील हा एक ऐतिहासिक टप्पा असून, या परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे पूर्णक्षमतेने सज्ज आहे.'

– डॉ. पी. डी. पाटील, कुलपती, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे.

'उच्च शिक्षणातील नाविन्यपूर्ण बदल आणि संशोधनाचा जागर या परिषदेच्या माध्यमातून होणार आहे. शताब्दी वर्षातील हे विचारमंथन उद्याच्या प्रगत भारताची पायाभरणी करेल. संशोधनासोबतच शैक्षणिक धोरणांमध्ये सर्वसमावेशक विद्याशाखांना सामावून घेणे हे या परिषदेचे उद्दिष्ट असेल.'

– डॉ. भाग्यश्रीताई पाटील, प्र-कुलपती, डॉ. डी. वाय. पाटील विद्यापीठ, पिंपरी, पुणे 'कुलगुरूंच्या राष्ट्रीय परिषदेच्या माध्यमातून भारतीय पारंपरिक ज्ञानाचा पाया आणि आधुनिक तंत्रज्ञानाची भरारी; विकसित भारताच्या स्वप्नपूतीर्साठी स्टार्टअप्स आणि संशोधनाची नवी पायरी उभारली जात आहे'.

- मा. डॉ. सोमनाथ पी. पाटील, प्र-कुलपती, ज्ञान प्रसाद ग्लोबल युनिव्हर्सिटी, पुणे आणि सचिव, डॉ. डी. वाय. पाटील युनीटेक सोसायटी, पुणे.

' या 'विद्येच्या माहेरघरात' उच्च शिक्षणाच्या धोरणात्मक निर्णयांची नवी दिशा ठरणार आहे. उच्च शिक्षणातील डिजिटल परिवर्तन आणि जागतिक दर्जाची शैक्षणिक गुणवत्ता यावर या बैठकीत महत्त्वाचे निर्णय घेतले जातील, जे पुढील दशकाची दिशा ठरवतील. ही परिषद उच्च शिक्षणातील नवकल्पना, संशोधन, परस्पर सहकार्य आणि भविष्यातील धोरणनिर्मिती यांसाठी एक प्रभावी व्यासपीठ ठरणार ०असून, भारताच्या शिक्षण व्यवस्थेला अधिक सक्षम, आधुनिक आणि प्रगत बनविण्यास महत्त्वपूर्ण योगदान देईल. भारतीय विद्यापीठ संघाच्या स्थापना दिन व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे. यावर्षीच्या व्याख्यानाचा विषय ह्यज्ञान आणि नाविन्यपूर्ण संशोधनातून आत्मनिर्भर भारताची घडण' - डॉ विनय सहस्त्रबुद्धे माजी खासदार, राज्यसभा आणि उपाध्यक्ष रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनीचे मुख्य व्याख्यातें०० म्हणून मार्गदर्शन करतील. याच कार्यक्रमात भारतीय विद्यापीठ संघाच्या शंभर वर्षांच्या प्रवासावर आधारित ह्यअसोसिएशन ऑफ इंडियन युनिव्हर्सिटीजः अ सेंचुरी ऑफ इव्होल्यूशन ट्रान्सफॉर्मेशन अँड लीडरशिप' या पुस्तकाचे प्रकाशन केले जाईल.

हे साप्ताहिक मालक,मुद्रक,प्रकाशक,डॉ.राजकुमार मा.कोल्हे यांनी जागृती प्रिटींग प्रेस,बी-१०१,भायखळा सर्विस इंडस्ट्रीयल इस्टेट,डी.के.क्रॉस रोड,भायखळा,मुंबई-४०००२७.येथे छापून ५०१,गोपी मॉल रेसिडेन्स,एनएसएस रोड,डोंबिवली (प.),ठाणे,महाराष्ट्र - ४२१२०२.येथुन प्रकाशित केले.संपादक : डॉ.सौ.प्रेरणा राजकुमार कोल्हे,
भ्रमणध्वनी :८४५२००५१९८/९२२१४३७४१४ ईमेल : **RNI No.: MHMAR/26/A2042**

Printed,Published And Owned By.**Dr.Rajkumar M.kolhe** Printed At Jagruti Printg Press,b-101,byculla Service Industrial Estate,D.K.Cross Road, Byculla,Mumbai-400027,andPublished From 501,Gopi Cine Mall Residence,NSS Road, Dombivli West, Thane, Maharashtra.**- 421202**
**Editor : Dr.Mrs.Prerna R.Kolhe,Mobile : 8452005198,Email :www.mahavidyalaykhabarbat.in, RNI No.:- MHMAR/26/A2042**